N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** खामगांव शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0695 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/12/2023 22:16

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 8 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 20/12/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/12/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:16 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:16 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/12/2023 **Time (वेळ):** 22:01 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 045

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/12/2023 22:01 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वस्तु व सेवाकर विभाग खामगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** चेतनसिंग कल्याणसिंग राजपुत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सहायक राज्यकर आयुक्त वस्तु ,सेवाकर विभाग खामगाव जिबुलढाणा, खामगांव शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सहायक राज्यकर आयुक्त वस्तु ,सेवाकर विभाग खामगाव जिबुलढाणा, खामगांव शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रविण मदनलाल अग्रवाल | | | 1. पितप्रसाद निवास, चाळीसबिगा, म,मलकापुर जिबुलढाणा , खामगांव शहर,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या 500 नोटा | 250,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

250,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 20.12.2023

फिर्याद

मी चेतनसिंग कल्याणसिंग राजपुत वय 43 वर्ष व्यवसाय नोकरी सहायक राज्यकर आयुक्त वस्तु व सेवाकर विभाग
खामगाव जि.बुलढाणा रा.डॉ.अशोक झुनझुनवाला यांचे घरी किरायाने, सीतानगर, जलंब रोड, खामगाव जि.बुलढाणा
मो.नं.7057521129.
पोलीस स्टेशन खामगाव शहर येथे हजर राहून समक्ष फिर्याद देतो की, मी वस्तु व सेवाकर विभाग खामगाव जि.
बुलढाणा येथे सहायक राज्यकर आयुक्त म्हणून माहे सप्टेंबर 2021 पासुन कार्यरत आहे.
माझ्या कार्यक्षेत्रातर्गत मलकापूर शहरामध्ये मदनलाल भिकुलाल अग्रवाल यांचे नावे मे.बजरंग इडस्ट्रीज मलकापूर
नावाची दालमील कंपनी आहे.सदरील व्यक्ती हे मयत झालेले असुन त्यांचे दोन मुल नामे 1.प्रविण व 2. महेश असे
दोघेजण सद्य:स्थितीत कार्यभार सांभाळतात.
मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीने शासकीय नियमाप्रमाणे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचा 2 कोटी
50 लाख रुपये वस्तु सेवा कर न भरल्याने मी दिनांक 24.06.2022 रोजी त्यांना नियमा प्रमाणे नोटीस काढून
टॅक्स भरणा करणे बाबत कळविले होते. परंतु त्यांनी टॅक्स न भरल्याने मी पुन्हा त्यांना दुसरी संधी म्हणून दिनांक
17.08.2022 रोजी व तिसरी संधी म्हणून दिनांक 10.02.2023 रोजी 2 कोटी 77 लाख रुपये टॅक्स भरणा
करणे बाबत कळवुन टॅक्स न भरल्यास त्यांची मालमत्ता जमीची फायनल ऑर्डर डिसेंबर 2023 मध्ये काढण्यात
येईल असे कळविले होते. मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचे वस्तु व सेवाकराचा कार्यभार पाहण्यासाठी
प्रविण मदनलाल अग्रवाल यांना नियुक्त केलेले आहे.
त्यामुळे मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचे मालक प्रविण मदनलाल अग्रवाल हे दिनांक 09.11.2023
रोजी माझ्याकडे खामगाव येथे ऑफीसला आले व मला म्हणाले की, मी माझ्या कंपनीचा सन 2017-2018 या
वित्तीय वर्षातील वस्तु सेवा कर न भरल्याने त्या प्रकरणात तुम्ही फायनल ऑर्डर काढणार आहेत. त्या ऑर्डर मध्ये
आमच्या कंपनीचा टॅक्स निल दाखवा त्यासाठी मी तुम्हाला 3,00,000/-रुपये देतो असे म्हणाले असता मी त्यांना
त्यावेळी नाही म्हणून सांगीतले. परंतु त्यांनी मला वेळोवेळी फोन करुन बेकायदेशीर काम करण्यास सांगुन त्यासाठी
3,00,000/-रुपये मला ऑफर देऊ करु लागले परंतु मी त्यांना प्रत्येक वेळी नाही म्हणलो.
दिनांक 19.12.2023 रोजी मला पुन्हा प्रविण अग्रवाल यांनी फोन केला की, तुम्ही माझे काम करा मी पैसे
वाढून देतो त्यासाठी मी दिनांक 20.12.2023 रोजी तुम्हाला तुमच्या ऑफीस मध्ये येवून भेटतो असे कळविले
होते. त्यावरुन मी दिनांक 20.12.2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उपअधीक्षक किरण
बिडवे यांना कॉल करुन माझी तक्रार असल्याबाबत कळविले असता ते माझ्या सागणे प्रमाणे आज रोजी त्यांच्या
पथकासह सीतानगर,जलंब रोड वरील माझ्या राहत्या घरी आले आहे.
मला माझे शासकिय कर्तव्य अप्रमाणिकपणे करण्यासाठी मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचे मालक प्रविण
मदनलाल अग्रवाल हे मला माझे ईच्छे विरुध्द लाच देऊ करत आहे. मला मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचे
काम अप्रामाणिक करुन प्रविण मदनलाल अग्रवाल यांचे कडुन लाच घेण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक
दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. त्यांनी स्वत: किंवा इतरा मार्फत
मला लाच देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचे वर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सीतानगर, जलंब
रोड, खामगाव येथील माझ्या राहत्या घरात दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक किरण बिडवे साहेबांनी सोबत

आणलेल्या दोन शासकीय पंचा सोबत माझी त्यांचेशी ओळख करुन त्यांचा परीचय करुन दिला. मी दिलेली तक्रार त्यांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी व बिडवे साहेबांनी मी दिलेली तक्रार वाचून त्यावर स्वाक्षरी केली आहे.
त्यानंतर मी दिलेल्या तक्रारी वरुन मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचे मालक प्रविण मदनलाल अग्रवाल हे मला लाच देऊ करतात काय? याची खात्री करण्यासाठी, लाचेची पडताळणी करण्यासाठी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकून पोलीस अंमलदार चेके यांनी व्हाईस रेकॉर्डर सूरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व बिडवे साहेबांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर मशीन माझ्या कोटाच्या वरच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी व पंच गायकवाड असे आम्ही माझ्या कारने राहत्या घरुन निघुन वस्तु व सेवाकर विभाग खामगाव येथे आलो. कार ही कार्यालयाच्या गेटजवळ उभी करुन पायी चालत कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील माझ्या कक्षात जावुन बसलो. त्यानंतर थोडया वेळाने प्रविण अग्रवाल हे माझ्या कक्षात आले. त्यावेळी माझ्या कक्षात माझे व प्रविण अग्रवाल यांचे आपसात कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यावेळी मी त्यांना सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स व्याजासह अंदाजे तीन कोटी भरा असे सांगितले. सदर चर्चा दरम्यान प्रविण अग्रवाल यांनी पंच क्र.1 गायकवाड यांचे समक्ष मे. बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचा सन 2017- 2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स न भरल्यामुळे काढण्यात येणाऱ्या मालमत्ता जप्तीच्या फायनल ऑर्डर मध्ये त्यांच्या कंपनीचा टॅक्स निल दाखवण्यासाठी 3,00,000/-रुपये लाच देण्याचे मान्य करुन घरच्या सोबत चर्चा करुन थोडया वेळाने सांगतो असे सांगितल्याने मी व पंच क्र.01 गायकवाड असे आम्ही दोघे कार्यालयातुन निघुन माझ्या राहत्या घरी परत आलो. त्यावेळी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार चेके यांनी बंद केला.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक बिडवे साहेबांनी पंच क्र.01 गायकवाड यांना विचारपूस करुन व व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता त्यामध्ये प्रविण अग्रवाल हे मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचा सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स न भरल्यामुळे काढण्यात येणाऱ्या मालमत्ता जप्तीच्या फायनल ऑर्डर मध्ये त्यांच्या कंपनीचा टॅक्स निल दाखवण्यासाठी 3,00,000/-रुपये लाच देण्याचे मान्य करुन घरच्या सोबत चर्चा करुन थोडया वेळाने सांगणार असले बाबत खात्री केली.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक किरण बिडवे साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथक असे आम्ही माझ्या कार्यालयात आलो. त्यावेळी मला प्रविण अग्रवाल यांनी फोन करुन ऑफीसला येत असलेबाबत कळविल्याने पोलीस अंमलदार चेके यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्या कोटाच्या वरच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक किरण बिडवे साहेब, पंच क्र.2 व सापळा पथक असे माझ्या कक्षातुन बाहेर निघुन गेले. मी व पंच क्र.1 गायकवाड असे आम्ही माझ्या कक्षात थांबुन राहिलो. त्यानंतर थोडया वेळाने प्रविण अग्रवाल हे माझ्या कक्षात आले. त्यावेळी माझ्या कक्षात माझे व प्रविण अग्रवाल यांचे आपसात कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यावेळी मी त्यांना सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स व्याजासह अंदाजे तीन कोटी भरा असे सांगितले. सदर चर्चा दरम्यान प्रविण अग्रवाल यांनी पंच क्र.1 गायकवाड यांचे समक्ष मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचा सन 2017.2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स न भरल्यामुळे काढण्यात येणाऱ्या मालमत्ता जप्तीच्या फायनल ऑर्डर मध्ये त्यांच्या कंपनीचा टॅक्स निल दाखवण्यासाठी तडजोड अंती 2,50,000/-रुपये लाच देण्याचे मान्य करुन पैसे घेऊन येतो असे म्हणुन निघुन गेले. त्यानंतर मी व पंच क्र.01 गायकवाड असे आम्ही दोघे सापळा पथका कडे परत आलो. त्यावेळी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार चेके यांनी बंद केला.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक बिडवे साहेबांनी पंच क्र.01 गायकवाड यांना विचारपूस करुन व व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता त्यामध्ये प्रविण अग्रवाल हे मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीचा सन 2017.2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स न भरल्यामुळे काढण्यात येणाऱ्या मालमत्ता जप्तीच्या फायनल ऑर्डर मध्ये त्यांच्या कंपनीचा टॅक्स निल दाखवण्यासाठी तडजोड अंती 2,50,000/-रुपये लाच देण्याचे मान्य करुन पैसे घेऊन येत असले बाबत खात्री केली. तसा सविस्तर लाच पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
दिनांक 20.12.2023 रोजी पोलीस उप अधिक्षक बिडवे साहेबांनी प्रविण अग्रवाल यांचे विरुध्द वस्तु व सेवाकर विभाग खामगाव येथे माझ्या कक्षात सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर वस्तु व सेवाकर विभाग खामगाव येथील माझ्या कक्षाची पंचा समक्ष झडती घेऊन सदर कक्षात कोणतेच पैसे नसले बाबत खात्री करण्यात आली. तसेच माझी सुध्दा पंचा समक्ष अंगझडती घेण्यात आली. प्रविण अग्रवाल यांनी मला लाच दिल्या नंतर कक्षातील खुर्ची वरुन उठुन दरवाज्या पर्यंत येऊन लाच दिल्याचा इशारा देण्याबाबत सुचना दिल्या. त्याबाबतचा पंचा समक्ष सविस्तर सापळापूर्व पंचनामा करण्यात आला.
त्यानंतर पोलीस अंमलदार चेके यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझ्या कोटाच्या वरच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक किरण बिडवे साहेब, पंच क्र.2 व सापळा पथक असे माझ्या कक्षातुन बाहेर निघुन गेले. मी व पंच क्र.1 गायकवाड असे आम्ही माझ्या कक्षात थांबुन राहिलो. त्यानतर थोडया वेळाने प्रविण अग्रवाल हे माझ्या

कक्षात आले. त्यावेळी प्रविण अग्रवाल यांनी त्यांच्या बॅग मधुन त्यांच्या उजव्या हाताने 2,50,000/-रुपये काढुन पंच क्र.01 गायकवाड यांचे समक्ष माझ्या टेबलवर ठेवली. त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे सायंकाळी अंदाजे सव्वा सहा वाजेच्या सुमारास लाच दिल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. मी पुर्वनियोजित इशारा करता क्षणीच सापळा पथक माझ्या कक्षा मध्ये आले. त्यावेळी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार चेके यांनी बंद केले. त्यानंतर बिडवे साहेबांनी पंच क्र.01 गायकवाड यांना लाचेची रक्कम कोणी दिली व कोठे ठेवली असे विचारले असता पंच क्र.01 गायकवाड यांनी तेथे कक्षात हजर असलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करुन हेच ते प्रविण अग्रवाल असुन त्यांनी त्यांच्या बॅगमधुन उजव्या हाताने 2,50,000/-रुपये लाचेची रक्कम काढुन टेबलवर ठेवली आहे असे सांगितल्याने प्रविण अग्रवाल यांना पंचा समक्ष लाचेच्या रकमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक बिडवे साहेब यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर प्रविण अग्रवाल यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रविण मदनलाल अग्रवाल वय 44 वर्ष व्यवसाय व्यापार रा. पितृप्रसाद निवास, चाळीसबिगा, मलकापुर जि.बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर बिडवे साहेब यांचे सूचने वरुन पंच क्र.02 उढाण यांनी टेबल वरील रक्कम मोजली असता त्यामध्ये 500/-रुपये दराच्या 500 नोटा एकुण 2,50,000/-रुपये असल्याची खात्री करुन सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर सदर 2,50,000/- रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसा सविस्तर सापळा पथकाने सापळा पंचनामा केला.

तरी दिनांक 20.12.2023 रोजी आरोपी प्रविण अग्रवाल यांनी मे.बजरंग इंडस्ट्रीज मलकापूर या कंपनीने शासकीय नियमाप्रमाणे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचा टॅक्स न भरल्यामुळे काढण्यात येणाऱ्या मालमत्ता जप्तीच्या फायनल ऑर्डर मध्ये त्यांच्या कंपनीचा टॅक्स निल दाखवण्यासाठी तडजोड अंती 2,50,000 रुपये लाच देण्याचे मान्य करुन मला माझे शासकिय कर्तव्य अप्रमाणिकपणे करण्यासाठी मला माझ्या कक्षा मध्ये 2,50,000/-रुपये लाचेची रक्कम दिली म्हणुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टाईप केली असुन त्यांची प्रिंट काढल्या नंतर मी वाचून पाहिली ती मी सांगीतल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

( किरण बिडवे )
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, जालना

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
NARENDRA GAJANAN THAKARE(I (Inspector)) / 010004402NGTM8001W or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफीसर

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): NARENDRA GAJANAI
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 01000402NGTM8001W